कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/पा.वि.स/२०२४–२५/८४८
दि. १५/०७/२०२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित विविध नाटयस्पर्धा म्हणजे गोमंतकीय रंगकर्मीना एक परवणी असून या स्पर्धेत प्रयोग सादर करतांना रंगकर्मीमधील प्रायोगिक मुल्ल्याची व क्षमतेची कस लागते. या स्पर्धा आयोजना संदर्भात कसल्याही त्रृटी असल्यास कलाकारांनी तसेच संस्थानी कला अकादमीच्या निदर्शनास आणून दिल्यास त्यावर नितशित्पणे उपाय योजना करु असे प्रतिपादन गोवा राज्याचे कला व संस्कृती मंत्री तसेच कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. गोविंद गावडे यांनी कला अकादमीच्या पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले. या प्रसंगी कला व संस्कृती खात्याचे संचालक श्री. सगुण वेळीप, कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. अरविंद खुटकर तसेच कार्यक्रम व विकास अधिकारी श्री. प्रदीप गांवकर व्यासपिठावर उपस्थित होते. या समारंभात मराठी 'अ' व 'ब' गट नाट्यस्पर्धा, कोंकणी नाट्यस्पर्धा तसेच राज्य कलाप्रदर्शनाच्या बक्षीस प्रात्र कलाकारांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रारंभी श्री. सदस्य सचिव अविंद खुटकर यांनी प्रास्ताविक करुन उपस्थितांचे स्वागत केले. श्रीमती सम्राज्ञी आईर यांनी सादर केलेल्या शारदा स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शेवटी श्री. प्रदीप गांवकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कर्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी श्री. संजीव झर्मेकर यांनी केले तर कार्यक्रम अधिकारी श्री. प्रशांत नागेशकर यांनी प्रमाणपत्रांचे वाचन केले.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः- फोटो

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)